**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## अभियांत्रिकी व तांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या हिवाळी २०२० परीक्षेकरीता ऑनलाईन परीक्षा आवेदनपत्रे भरण्याबाबत सूचना

अमरावती-

अभियांत्रिकी व तांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, हिवाळी २०२० परीक्षेकरीता बी.ई., बी.टेक., बी.टेक्स. आणि बी.आर्च. या अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे ऑनलाईन पोर्टलद्वारे स्वीकारण्याची कार्यवाही सुरु झालेली आहे. बी.ई., बी.टेक., बी.टेक्स. सेमिस्टर ५, ७ व बी.आर्च. सेमिस्टर ३, ५, ७ आणि ९ या परीक्षेकरीता नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे तसेच बी.ई., बी.टेक., बी.टेक्स. सेमिस्टर ७, ८ व बी.आर्च. सेमिस्टर ९ आणि १० या परीक्षेकरीता माजी विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्रे स्वीकारण्याचा कालावधी दि. ७ ते १६ जानेवारी, २०२१ असा असून दि. २३ जानेवारीपर्यंत रूपये ५०/- विलंब शुल्कासह स्वीकारण्यासाठी अंतीम तारीख निश्चित करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाशी तातडीने संपर्क साधून आपले परीक्षा आवेदनपत्रे महाविद्यालयात सादर करावयाचे आहे. महाविद्यालयांनी ऑनलाईन पोर्टलवर लॉगिनद्वारे दि. २७ जानेवारी, २०२१ पर्यंत विद्यार्थ्यांनी भरलेली आवेदनपत्रे तपासणी अनिवार्यपणे करावयाची असून दि. २८ जानेवारी रोजी विद्यापीठात सर्व आवेदनपत्रे न चुकता सादर करावयाची आहेत. महाविद्यालयांनी शक्यतोवर विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क रोख स्वरुपात स्वीकारावयाची असून तथापि, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन एस.बी.आय. कलेक्ट द्वारे शुल्क भरले असल्यास महाविद्यालयांनी अशा ऑनलाईन पावतीची पडताळणी करुन ती प्रमाणित करुन घ्यावयाची आहे. यासंदर्भात विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख यांनी सर्व संलग्नित अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालये यांना पत्र पाठवून कळविले आहे. विद्यार्थ्यांना सूचना की, त्यांनी याची नोंद घ्यावी, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. ०८/०१/२०२१.
दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी